॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ९ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्राच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विद्यार्थिनींसाठी व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा घेण्यात आली.

विद्यार्थी विकास विभागाच्या सहकार्याने झालेल्या या कार्यशाळेचे उद्‌घाटन संचालक प्रा. सत्यजित साळवे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी सामाजिकशास्त्र प्रशाळेच्या संचालक डॉ. अर्चना देगावकर होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मंजूषा क्षीरसागर, डॉ. योगिता पाटील व युवती सभा प्रमुख डॉ. विश्रांती मुंजेवार उपस्थित होत्या.

या कार्यशाळेत चार सत्र झालीत. लिंगभावाचा प्रभाव व स्त्री-पुरुष समानता या विषयावर डॉ. मंजूषा क्षीरसागर, व्यक्तिमत्त्व विकासावर डॉ. योगिता पाटील, स्त्री विषयक कायदे या विषयावर डॉ. विजेता सिंग आणि जीवन कौशल्य यावर डॉ. मनिषा इंदाणी यांनी मार्गदर्शन केले. डॉ. रत्नमाला बेंद्रे यांच्या उपस्थितीत समारोप झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विशाल सपकाळे यांनी केले. डॉ. विश्रांती मुंजेवार यांनी आभार मानले.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : ९ मार्च, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी